# उपद्व्यापी ओवी



अनघा हिरे

# उपद्व्यापी ओवी

अनघा हिरे

ई साहित्य प्रतिष्ठान

उपद्व्यापी ओवी (बालकथा)

लेखिका : अनघा हिरे

Phone no. ९४२२२८४११६

Email: anagha.hiray@gmail.com

७०५, साईद्वारका रेसिडेन्सी,

बनकर मळा ,काठे गल्ली ,

द्वारका , नासिक –४२२००९

ब्लॉग  http://anaghah.blogspot.in

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

## प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन  :२५ सप्टेंबर २०१६

©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे - आवश्यकआहे.

ओवी ही ४ वर्षाची वात्रट मुलगी आहे . तिला वाढवतांना आईला खूप संयमाने घ्यावे लागत असते .तिला कधीही न रागावता न  मारता फक्त तिच्या मनाचा विचार करत बाल मानसशास्त्राचा उपयोग करत आईने तिला छान फुलवले आहे .

वरवर पहाता ही आदर्शवादी काल्पनिक कथा वाटेल. पण स्वतः लेखिकेने आपल्या लेकींना वाढवताना आलेले प्रत्यक्ष अनुभवच या कथांतून मांडले आहेत. या कथा त्यातील प्रसंग आणि व्यक्तीरेखा या सत्य असून त्या काल्पनिक वाटल्यास वाचकाने स्वतःला चिमटा काढावा. अगदी या कथांतून आलेली नांवे, अदिती आणि ओवी या लेखिकेच्या स्वतःच्या लेकी आहेत. आणि हे सर्व अनुभव शत प्रतिशत सत्य आहेत.



अनघा हिरे सुप्रसिध्द लेखिका आहेत. त्यांनी आजवर अनेक पुस्तके लिहिली व अनुवादित केली आहेत. यात National Book Trust India तर्फे बावीस भाषांतून अनुवादित होऊ घातलेल्या “मधूचे मधप्रेम “ या पुस्तकाचा समावेश आहे . नेपाली बेडकाचे साहसी कारनामे, ड्रगन त्सुनामी (जपानी लोक कथा ) , The letters from the forest school आदी पुस्तकांचे त्यांचे अनुवाद प्रसिद्ध झालेले आहे .

या छापील पुस्तकां सोबतच त्यांनी “ढ ढ ढगुल्या, पक्षांना रंग कसे मिळाले आदी ई पुस्तके लिहिली आहेत . तसेच बालनेटाक्षरी या ई मासिकाचे संपादनही केले आहे .त्या ई साहित्य प्रतिष्ठानच्या बालविभाग प्रमुख आहेत. त्या शिवाय “माझ्यामना ई प्रकाशनाच्या त्या मुख्य संपादिका आहेत . ज्या गोष्टीत आनंद मिळतो त्या गोष्टीत झोकून देण्याचा त्यांचा स्वभाव हेच त्यांचे विशिष्ट म्हणता येईल.

अर्पणपत्रिका

पुस्तक वाचून दाखवता दाखवता ज्यांच्यामुळे
लिखाणाची प्रेरणा निर्माण झाली
त्या माझ्या लाडक्या चिमण्या आदिती आणि ओवीस

अनघा हिरे

# ओवीचे पाणी

आई मला पाणी पाहिजे.

आईने उंच ठेवलेला पेला हात वर करून काढला आणि ओवीला पाणी दिले

आईकडे बघतच ओवी विचार करत होती "आई किती मोठी आहे . पेला किती उंच जागेवर आहे"
रोज रोज आई कडे पाणी मागण्यापेक्षा आता आपणच पाणी घेऊया

'काय करावं बरं ... हं आई पोळी करतांना तिच्या शेजारी उभं राहून पोळी दिसत नव्हती...

तेव्हा डब्यावर उभं राहिलो होतो... आता तसंच करूया'

डबा घेऊन त्यावर उभं राहिलो तरी पेला अजून उंचच!!

एक पाय डब्यावर दोन्ही हाताने ओटयाला पकडून आरामात दुसरा पाय ओटयावर ठेवला. झालं आता खुपच उंच उभ राहिलो. पेला पण हातात पोहचला.

वा! किती मजा! आई मला पेला काढता आला .आता मी रोज माझ्या हातानेच पाणी घेईन बरं का!

आईने पण आनंदाने ओवीची पापी घेतली आणि तिला खाली उतरवल .



थोडयावेळाने ओवी पुन्हा डब्यावर उभी राहुन ओटयावर चढली... पेला काढला आणि माठाचा नळ चालु केला. नळ चालु बंद करतांना तिला फार मजा वाटली. नळ बंद केल्यानंतरही थेंब थेंब पाणी का गळत असेल? खुप वेळ वरून खालून न्याहाळून शेवटी नळाचा नाद सोडला पेल्यातून एक घोट पाणी पिऊन सगळं पाणी फेकून दिलं.

आता खाली उतरायचं कसं?तसंच जसं पलंगावरून

उतरतो खुप प्रॅक्टीस असल्यामुळे ओटयावरून उतरणं अगदी सोप्पं होतं.

आई . . मी माझ्या हाताने पाणी घेतलं.

‘मला माहित आहे .मी बघत होते शोनूला... शाब्बास! एकदम गुडगर्ल झालीस.

मघाचा तो नळ किती छान होता. त्याच्यातून अजूनही थेंबाथेंबाने पाणी बाहेर येत असेन. बघायला जायला हवं!

पुन्हा डबा घेऊन ओटयावर चढून ओवी फत्कल मारून ओटयावर बसली.नळ चालू करून बघितला परत बंद केला परत चालू केला

आई माठाचं पाणी बघ कस दिसतंय... पाऊस पडला होता तेव्हा आजीच्या गच्चीवर खूप पाणी साचल होत. मग आजोबांनी ते पाणी खराटयाने झाडल आणि ते छान खाली पडायला लागल. अगदी तसच दिसतय ना?

आई आजोबा गच्चीला नळ का बसवत नाही? फक्त नळ चालु करायचा कि झालं... सगळं पाणी आपोआप खाली येईन. मी आजोबांना फोन करून सांगेन.

आई माठातल पाणी संपलं बघ.

आईने ओवीला खाली उतरवलं आणि माठाला नळी लावली.

नळी पकडण्याचा हा चान्स घालवायला नको. पुन्हा ओटयावर चढलंच पाहिजे

ओवीने घाईघाईत सर्व कृती आवरून ओटयावर उभं राहून नळी हातात मिळालीच .

आई छोटा धबधबा बघ!

आई माठात मुंगळा पडलाय बघ. तो आपल्या माठात काय करतोय?त्याचा हा काय स्विमिंग टॅंक आहे?

ओवीच्या मनात काय आले कोणास ठाऊक नळी आईच्या ताब्यात दिली आणि ओटयावरून खाली उतरली.

बाथरूम मधला धुण धुण्याचा टब अजुन मोठा असता तर त्यालाच मस्त पैकी आपला स्विमिंग टॅंक बनवला असता.

बाथरूमच्या दिशेने निघालेल्या ओवीच्या मनात काय असेन हे आईने ओळखले.

ओवी ए बाबु इकडे ये. हे बघ हे पाणी कसे गोलगोल फिरतंय. पळत ये इकडे.

आई कसं काय गं गोल फिरतंय पाणी? आणि तो मुंगळा कुठे गेला ?

त्याला खुप थंडी वाजत होती म्हणून त्याने स्विमिंग चा बेत कॅन्सल केला.आता तो आई च्या कुशीत गुडूप होऊन गाईगाई करणार आहे. शमजलं का शोनूला ?

आईने दिलेले उत्तर ओवीला समजले आता आईच्या कडेवर बसून ती खाली उतरली आणि आईच्या कुशीत झोपायला तयार पण झाली.

आणि ओवी पुन्हा आपल्या स्वपनात गुंग झाली.

## ओवीला ताप आला

भुम्म भुम्म ताईने गाडी चालवली
मग टुण्णुक टुण्णुक उड्या मारल्या
गर्र गर्र गिरकया घेतल्या
फर्र फर्र शिट्टी वाजवली
खूप खूप गमती केल्या
पण ओवीला कशातच मजा वाटेना
ती आपली उदास उदास एका जागेवर बसुन राहिली
कारण ............

कारण ओवीला ताप आला होता




आईने दुध दिले; पण ओवीला ते नको होते...

बाबांनी अक्रोड दिला; पण ओवीला तो नको होता...

ताईने कॅडबरी दिली; पण ओवीला ती नको होती...

कारण ओवीला ताप आला होता
का? ......

का ओवीला ताप आला?
रंगी बेरंगी बर्फाचा गोळा
खुप खाल्ला . मटामटा खाल्ला
दात दुखला
घसा दुखला
आज कान ही दुखू लागला
मग ......

मग आईने आणले तापाचे औषध
आणि सांगितली एक गोष्ट
घेतला एक चमचा
चमच्यात भरले औषध
छान छान औषध ओवीने पिले पटकन
आता ......

आता काय होणार
औषध पोटात जाणार
पोटातल्या किटाणुंशी खुप ढिश्र्श्युम ढिश्र्श्युम करणार
किटाणुंना चलेजाव! चलेजाव! म्हणणार
खरंच ......

खरंच माहिती आहे का तुम्हाला?
किटाणु औषधाला खुप घाबरतात
औषध पोटात आलं कि म्हणते कसे
“नको ना येऊ”
“नको ना येऊ”
तरी औषध ऐकत नाही
खुशाल तरातरा चालायला लागते आणि
जाऊन पोहचते किटाणुंच्या अड्यावर
मग ......

मग किटाणु म्हणतात कसे
‘नको ना! मला मारू’
‘नको ना! मला मारू’

‘मी जातो ना! निघून’
‘मी जातो ना! निघून’
आणि किटाणु निघून जातात
आणि ताप पळून जातो.
ओवी खुप खुश होते आनंदाने खेळायला लागते.



# ओवीच्या बोलक्या वस्तु

आई माझा गाल बघ कसा हसतोय! त्याला खुप आनंद झाला. तो म्हणाला आईने बघ माझीच पपी घेतली.पण आई या हाताला वाईट वाटतंय... तो म्हणतोय आईनी माझी पपी नाही घेतली. आई ,तु या हाताची सुध्दा आई आहे नां? बघ रे हात आई तुझी सुध्दा आहे. आता आईवर रागवायच नाही बरंका!

ओवी ऽ ए ऽ बाबू , तुझ्या हाताला खरच वाईट वाटतय? थांब हं,मी त्याला खुश करते. मी तुझ्या हाताला खाऊ देते हे घे दोन बदाम एक हया हाताला ,आणि एक दुसऱ्या हाताला. आता खुश.

मुन्ना तुला जेवायचं आहे ना? जा तो बेसिनचा नळ आणि साबण तुझी वाट बघतायेत ते कधिचे म्हणतायेत ‘आई ओवी आमच्या कडे आलीच नाही’

आई ऽऽ हया भिंतीला काहीतरी सांग ना, मी हाताचे शिक्के भिंतीवर मारले तर ती म्हणते मला अजून शिक्के पाहिजे; मला अजून शिक्के पाहिजे.

ए नको गं भिंत आता ओवीला जेवायचय ना? बघ तिने धुतलेले हात परत खराब केले, आता तिला परत हात धुवावे लागेल ना... तिचे जेवण झालं कि ती पुन्हा येईन हं तुझ्याकडे खेळायला. चल पाठव तिला पटकन.

आईने काय सांगितलं समजलं ना भिंती तुला, मी चालले.

आई आज काय देणार खायला? मुळा? का बर गं आई भेंडी का नाही केली?

छे तो मुळा सकाळ पासुन रडत होता. तो म्हणाला मी ओवीशी कट्टी घेईन... ती नुसती भेंडीच खाते मुळा खातच नाही. म्हणुन ग केला मुळा. तुला नाही ना आवडत कोणी रडलेलं?

आई यम्मी भाजी आहे .

वा! शाब्बास! आता फिनिश करायचं सगळं आणि त्या मुळयाला पण गुडबॉय म्हणायचं बरं का.

आई मी उदया आजी कडे जाऊ का? माझ फार महत्वाच काम आहे आजीकडे.

हो जा. पण कसलं काम आहे तुझं?

आजीला एक गंम्मत सांगायची आहे. जाऊ दे आमच सिक्रेट आहे .तुला नाही सांगणार ते !

बरं बरं नको हं सागु मला.

आजी तुझ्याकडे मुळा आहे? काल ना आमच्या फ्रिज मध्ये मुळाच नाही उरला... .मला त्याला गुडबॉय म्हणायचं. मला आईने सांगितलं. आजी तु माझ्या झाडाला पाणी घातल का? थांब मीच घालते. चल आजी आपण मुळाचं झाड लावू... चल मी शिकवते ना तुला!

ए चिखल आता मामा येईल ऑफिस मधून तो रागवेल तु ओटयावर आला म्हणुन. चल मी तुला आंघोळ घालते! ए आजी मला थोड

पाणी आणुन दे ग खुप काम बाकी आहे तू मला मदत कर ना थोडी !

ओवी तू आज माझ्याकडेच थांब . माझ्या शेजारीच झोप (ओवी कधिच न स्विकारणारी आजीनी विनवनी केली)

नाही मी आईकडेच जाणार अगं आजी तुला माहीती आहे ना मी जर आई शेजारी झोपली नाही तर तिला झोपच येत नाही.आई ला माझीच सवय आहे नां ! म्हणुन आई कडे झोपायला जाते मी

तुझ्याकडे उदया परत येईन.

आई मी आज आंघोळीच्या पाण्याशी कट्टी घेतली कारण काल ते माझ्या कानात गेला होतं.

वा! छान बहाणा आहे हं ओवी तुझा रोज आंघोळीच्या वेळेस त्याच्याशी कट्टी घेते आणी टबमध्ये जेव्हा शॅम्पुचा फेस केला कि खुप खुप वेळ त्याच्याशी खेळत बसते. पाण्यात खेळायला आवडतय मग आंघोळीला जाई जाई पर्यंत का बिच्चाऱ्या पाण्याशी कट्टी घेते. असं नाही चालणार हं...

अग आई मी मजा करत असते मी लगेच त्याच्याशी बट्टी घेत असते. मग तो खुप वेळ मला तिथे खेळु देतो. माझी गंमत असते ती खोटी खोटी. खरच नाही काही मी कट्टी घेत.

आई मी सॉरी म्हटली ना त्याला!
कोणाला?

ताईच्या ऽऽ केसांना

ताईच्या केसांना? म्हणजे काय झालं त्यांना?

अग आई मी काही नाही केलं नाही सगळ त्या कात्रीनेच केलं... तीच आपली पळत होती ताईच्या केसांवरून

कात्री पळत होती? कुठे? ताईच्या केसात? अरे बापरे.

‘आदिती झोपेतून उठ राजा बघु काय झाल आता चला खाली पार्लर मध्ये जाव लागणार बेटा बॉय......कट......करायला



आई तु ओवीला कधीतरी मार ना मला वर्गात सगळे चिडवतील हिच्यामुळे काही होणार नाही बेटा उलट तू सुंदरच दिसशील. खरंच चल डोळे पुस राजा
ताई ताई तु हया कात्रीला मार तिनेच तुझे केस कापले
ओवी अजुन कोणा कोणाला त्रास दिला गं हया कात्रीने.

अग आई अजून कोणालाच त्रास नाही दिला तो सोहम आहे ना सोहम तो म्हणाला आज आपण पार्लर पार्लर खेळू म्हणुन मी त्याचा मशरूम कट केला. आणी तोच मला बिल लिहून देत होता. आई केस मी कापले मग बिल पण मीच देणार ना? तर तोच मला बिल देत होता म्हणुन ते बिलच मी कात्रीने कापुन टाकले .

बघु त्याने दिलेले बिल.

बर झाल काही कामाचा कागद नव्हता तो.

पण बाबू कात्री मोठया माणसांची असते नां? तुला मी सांगितल होत ना कात्रीला हात लावयचा नाही... बघ कात्रीने किती त्रास दिला आपल्या ताईला ताई बघ किती रडतेय.

सोहमच्या आईने बघितला का त्याचा मशरूम कट?

ए कात्री सॉरी म्हण न माझ्या ताईला. ताई कात्री सॉरी म्हणाली बघ तुला अगं ताई आईने तुझा तरी बॉयकट केला काकीने तर सोहमचा चांगला टकलूच केला

अशा हया ओवीच्या बोलकया वस्तू आणि ओवी एकमेकात इतके गुंग असतात आणि त्या मुळे नेहमी होणार थोडया खोडया थोडया मजा.

स्वप्नाळू ओवी स्वप्नातच गुंग होते

(मी शाळेत जात नाही...)

‘मी शाळेत जात नाही आईने मला शाळेतच टाकलं नाही. आई तु कधी शाळेत टाकणार मला? मला पण ताई सारख दप्तर हवं; ताई सारखी वही हवी ; आणि ताई सारखाच डबा हवा. नको नको ताई सारखा नको मला यल्लो कलरचा डब्बा हवा. आई मी पण शाळेत जाणार रिक्षातून.’

‘हो आपण जाऊ हं जुन महिन्यात शाळेत !’



नाहि गं आई मला आत्ताच जायचं शाळेत. तू मला कधीच शाळेत जाऊ देत नाही.

ओवीचा आणि तिच्या आईचा हा रोजचाच संवाद होता. घरी कोणी पाहुणे आले कि ओवीला विचारायचे तु शाळेत जातेस का? ओवी चक्कपैकी सांगायची मला आईने शाळेतच नाही टाकलं.

ओवीची शाळेत जाण्याची तयारी अगदी बाळ असल्यापासूनची होती. खेळण्यातली बास्केट घेऊन नेहमी सगळयांना टाटा करत निघायची

मग विचारलं तु कुठे चालली कि म्हणायची मी छालेत चालली.

थोडी थोडी मोठी झाली मग म्हणायची 'आई माजी लिक्शा आली मी चाल्ले'

ओवीची शाळेची एवढी हौस म्हणुन तिच्या आजीने तिचा तिसरा वाढदिवस होता तेव्हा तिला छानशी सॅक आणली. मग काय विचारायलाच नको ताई जस दप्तर भरते तसच दप्तर ओवीला भरायचे होते. मिळेल ते पुस्तक मिळेल ती वही भरून ओवी शाळेत निघायची. मी पण शाळेत येते म्हणून ताईच्या मागे लागायची.

अशा शाळेची हौस असणाऱ्या ओवीला आईने शाळेत घातलंच नाही ओवी लहान होती

म्हणुन आई तिला शाळेत पाठवत नव्हती. घर हेच तिची शाळा बनले.

ओवी सकाळी उठली कि आई तिला विचारायची ‘आज ब्रश वर आपण कोणती पेस्ट घ्यायची लाल कि पांढरी कि निळी आता पेस्ट घ्यायची कशी लांब कि गोल कि पसरट. रोज रोज ओवीची चॉईस अनं ओवी खुष. आंघोळ झाल्यावर कपडे कोणते घालायचे पिंक कि ब्ल्यु कि यल्लो. दुधात मायलो किती घ्यायचे फक्त दोनच चमचे एक आणि दोन बस्स.

चॉकलेट सगळयांना वाटताना मोजत मोजतच वाटायचे .

ह्या महिन्यात कोणाचे हॅपी बर्थडे आहे हे ओवीनेच लक्षात ठेवायचे.

अंकगणिता बरोबर ओवी निरिक्षणाचा पण अभ्यास करायची.

आई स्वयंपाक कशी करते? बाबा दाढी कसे करतात? ताई पेनात शाई कशी भरते? आजी लसुन कसा सोलते? सगळयांच्या कामाकडे एक टक लाऊन बघताना तिच्या हजारो प्रश्नांना उत्तर दयायला सगळेच तयार रहातात.

ओवी रॅकमधले सगळी भांडी खाली लाईनीत उभी करते लाईनीत उभी करतांना लहान मोठयाचा क्रम जपते. कधी वाटयांचा मोठ्ठा गोल करते आणि त्या गोलात स्वतः जाऊन बसते ही सर्व भांडी तिच खुप ऐकतात. ती त्यांच्याशी हुकूमी आवाजात बोलते आणि ते चुपचाप ऐकतात... बिच्चारे! ओवीची



स्वतःची एक प्रयोग शाळा आहे. घरातल्या गॅलरीत चारपाच तरी वाटया पडलेल्या असतात. एकाच वेळी त्या वाटयांमध्ये वेगवेगळे प्रयोग चाललेले असतात. वाटयांमध्ये भरपुर माती असते भरपुर पाणी असते .काही चिखलात बरबटलेल्या वाटया प्रयोगातुन बाद झालेल्या असतात.

एकदा ताईला शाळेत झाड लावायचा प्रोजेक्ट करायचा होता.

ताई बरोबर ओवीने ही आपला प्रोजेक्ट आवरून टाकला.

आई सारखाच आपल्याला पण लॅप टॉप असावा असे असेल कधीतरी मनात म्हणुन मिठाईच्या खोक्याला तिने लॅपटॉप बनवला. ताईने सुद्धा त्याला छानशे बटन रंगवुन दिले आणि स्क्रिन वर चक्कपैकी ओवी फोल्डर बनवले. मोबाईलच्या दोरीला तिने पेनड्राईव्ह बनवला. पेनडावी .पेनडावी करत तिने सगळयांना दाखवला.

रोज खिडकितुन खाली किती ओढण्या पडतात. एवढे चिमटे लावुन देखिल खाली कसे जातात. सगळयांना प्रश्न पडला होता. यावर काढावा काय उपाय ? बाबांनी सांगितलं कपडे घरातच वाळत टाका. घरात कपडे

वाळत टाकुन सुद्धा आता ओढण्या खाली कश्या पडतात? 'आई चोर सापडला' असे ताई नी आईच्या कानातच सांगितले. मग सगळयांनी हळुच ओवीला पाहिले. आईने परत खिडकित कपडे वाळायला टाकले. कपडे वाळत घालता घालता मुद्दाम ओली ओढणी खाली पाडली ओवीने ती बघितली.

अरे हि ओढणी कशी काय खाली पटकन पडली? रोजची ओढणी किती छान हवेत उडत जाते? ओवीने तिची हॅट खाली टाकली ति सुद्धा हळुहळू खाली गेली मग ताईने तिला एक मजा दाखवली प्लास्टिकच्या पिशवीचे पॅरॅशुट बनवले एक तसेच ठेवले एकाला दगड बांधला आणि वरून खाली टाकला. ओवीच्या खेळात अजून भर पडली.

ओवीच्या लिखाणाला कधी पाटी पुरलीच नाही म्हणुन उरलेले लिखान सरळ तिने भिंतीवरच केले. भिंती भरल्या, दरवाजे भरले, फर्निचर वरची जागा सुद्धा भरली. लिखानाला अजुन जागा हवी म्हणुन त्यावर उपाय सुद्धा तिनेच शोधुन काढला. एक दिवशी घासणी साबण घेऊन तिने भिंतीच घासुन काढल्या. रंग निघाला, पोपडे निघाले. आता त्यातुन तिने नविन निर्मिती केली. भिंतीचे पोपडे काढायचा नवा छंद जोपासला. कुठे बसलेला भू भू, कुठे सिल मासा, कुठे चिकन लेग असे वेगवेगळे आकार तिनेच शोधून काढले.

आता ॲडमिशनची तयारी चालू असताना ॲडमिशन विषयी घरातले विषय

ऐकून ऐकून तिने तिचे मत सांगून टाकले . 'बाबा मी आदू ताईच्याच शाळेत जाणार .आईला माझ्या ॲडमिशनला पैसे दया!' मग बाबांनी सुद्धा खिशातुन पन्नास रूपये काढून दिले आणि सांगितल हे घे .निट जपुन ठेव पुर्ण पाच हजार रूपये आहेत हं!

ओवीने सुद्धा ते पैसे खुप जपले घरात येणा ्या प्रत्येक पाहूण्यांना तिचे पाच हजार रूपये दाखवले .आणि त्यांच्या कडून आठवनीने परत घेतले.

ओवीच घरातल शिक्षण चालू असल तरी आता जुन महिन्यात ती शाळेत जाणार आहे. बालवाडीला!

==========================================================================

# ओवीचे पुस्तकाचे दुकान

ओवीची शाळा घरातच चालली होती.म्हणुन आईने ओवीला अभ्यासाला बेंच आणला एक कपाट फक्त ओवीला दिले त्यात तिने तिचे खेळणे ठेवले, एक कप्पा अभ्यासाचा, एक कप्पा लायब्ररीचा, आता लायब्ररीचा कप्पा केला म्हणजे त्यात ठेवायला पुस्तके हि हवीच ना! मग जेव्हा जमेल तेव्हा नवीन पुस्तक आणून यात भर पडली जात.

रिकाम्यावेळेचेओवीचे एकच काम एखादं पुस्तक कपाटातुन काढायच आणि घर भर पुस्तक घेऊन हिंडायचं.

स्वतःचं चित्र बघत बसायचं नाहीतर गोष्ट वाचून दाखव म्हणून कोणाच्या तरी मागे लागायचं.

रात्री झोपताना आई पुस्तक वाचून दाखवायची. रवीवारी तर ओवीची खुप मजा व्हायची. ताईला शाळेला सुट्टी. मग काय विचारायलाच नको. ताई पेपरमधल्या गोष्टी



वाचून दाखवायची सगळया पेपर मधल्या गोष्टी झाल्या कि पुस्तकातल्या गोष्टी. बाबा असेच कधितरी एखादी गोष्ट

वाचून दाखवायचे.

"मला पुस्तक खुप आवडते.मला त्याच्यातले चित्र खुप आवडतात"

पुस्तक जवळ घेऊनच ओवी झोपायची

अश्या हया पुस्तक वेडया ओवीला पुस्तकाच्या मोठया दुकानात आई घेऊन गेली. दुकानात सगळीकडे ओवी खुप हिंडली.आई खुप पुस्तकं बघत होती परत खाली ठेवत होती. छोटीशी ओवी उंच टेबलावर ठेवलेले पुस्तक बघूच शकत नव्हती. आईने हातात पुस्तक घेतलं कि तिला फक्त पुस्तकावरचे चित्रच दिसायचे. खुप वेळ मान वर करून करून ओवी थकली.

कोपऱ्यात तिला प्लास्टिकची एक खुर्ची दिसली. खुर्चीला बघुन एक आयडिया सुचली.

लगेच गेली खुर्चीकडे. खुर्चीवर होते चार पाच पुस्तकं धरले अन ठेवले खालती मग ओढत ओढत आणली खुर्ची आई जवळ.



खुर्चीच्या आवाजाने सगळे आपले ओवीकडेच बघत बसले. काऊंटर वरचे काका आले लगेच उठून थोड्या रागावल्या आवाजाने म्हणाले हे काय चालू !

ओवीने त्यांना लगेच सांगून टाकले काका टेबल केवढा उंच आहे पुस्तकांचे चित्र कसे पाहू ?

काका किंचित गालात हसले आणि मग त्यांना समजले मुलांसाठी आणलेली ढिगभर पुस्तकं आणि आपण ठेवली टेबलावर. मुलांचे पुस्तक मुलांनी नाही बघायचे तर कोणी बघायचे.

काकांनी लगेचच चार पाच माणसांना सांगितल चला रे तो कोपरा करा रिकामा, तिथे फक्त सतरंजी अंथरा आणि सगळे पुस्तक खालीच ठेवा.

ओवीची कल्पना काकांना कळली, काकांची गम्मत ओवीला आवडली.

मग ओवी सतरंजीवरच फत्तकल मारून बसली. तिने खुप खुप पुस्तक बघितली. प्राण्यांची, पक्षांचे, गाडयांचे , फुलांचे, फळांचे, रंगीबेरंगी छान छान.

आईने पण तिच्यासाठी खुप छान छान पुस्तक घेतली पुस्तक बघून ओवीला खुप आनंद झाला

घरी आल्यावर आईने ओवीला काही गोष्टी वाचुन दाखवल्या. काही गाणी म्हणुन दाखवली. मग ओवी म्हणाली आई आता मी तुला गोष्ट वाचुन दाखवते.

ओवीने घेतले चित्रांचे पुस्तक मग तिने आईला खुप पक्षी दाखवले

खुप फळं दाखवली आणि खुप प्राणी दाखवले.

मध्येच ओवीला काहीतरी आठवले "आई मी मोठी झाली कि खुप मोठ पुस्तकांचं दूकान टाकणार आहे तु माझ्या दुकानात

येशील का पुस्तक घ्यायला? मग मी तुला खुर्ची देईन उभं रहायला.

‘खुर्ची कशाला गं बाबू मला?

अगं मी मोठी होईन तेव्हा तु बाळ असशिल ना! मग तुझा हात काय पोहचणार का टेबलावर?

‘का तु खाली नाही का पुस्तक ठेवणार आज त्या काकांनी ठेवले तसे?

अगं आई पाऊस आला तर पुस्तक खराब नाही का होणार? आणि सोहम माझ्या दुकानात आला तर तो पुस्तक इकडे तिकडे फेकेन ना!

‘सोहम मोठा नाही का होणार तुझ्यासारखा ? मग कसे पुस्तक फेकेन ?

अरे हां !



'आणि काय रे शोनू तु तर आईसक्रिमचं दुकान टाकणार होतीस ना? मग एकदम प्लॅन चेन्ज झाला?

हो आता पुस्तकांचंच दुकान टाकणार आहे आणि त्या दुकानात खुप खुप पुस्तक ठेवणार शंभर पुस्तक ठेवणार.

आज पासुन ओवीने काही दिवसांसाठी ठरवलय मोठे पणी काय व्हायच आहे.

ओवी पुन्हा आपल्या स्वप्नात रंगुन गेली.

## ओवीचे रंगकाम रंगले

ताईने डब्बाभर तेलकटखडू ओवीला देऊन टाकले .

‘ओवी मी आता पाचवीला गेली आहे ना!मग मला तेलकट खडू नको मी आता वॉटर कलर घेणार आहे.’

आई मला पण दे ना ताई सारखे वॉटर कलर, वॉटर कलरचा एक ब्रश घेऊन ओवी सकाळ पासुन आईच्या मागे लागली होती.

‘अरे बाबु आपण वॉटर कलरने भिंतीवर चित्र काढत होतो तेव्हा कसे कपडे खराब झाले होते, सगळे हात खराब झाले होते, आणि आपली मॅट पण केवढी खराब झाली होती. तुला

स्वच्छ व्हायला पण किती वेळ लागला होता बरोबर आहे ना? मग आपल्याला नको आत्ता वॉटर कलर आपण मोठं झालं कि घेऊ हं वॉटर कलर'



'आई आता ताई शाळेतुन येतांना रोज खुप खराब होऊन येणार?'

'नाही गं ओवी मी फक्त गुरूवारीच खराब होऊन येईन कारण गुरूवारीच माझा ड्रॉईंगचा तास असणार आहे.'

......ताईच्या उत्तरावर ओवी विचार करू लागली ओवी बाथरूम मध्ये गेली हॅन्डग्लोज

घेऊन आली 'ताई हे हॅन्डग्लोज घालुनच ड्रॉईंग कर बर का!

'नाही ना करता येणार मला हॅन्डग्लोज घालुन ड्रॉईंग'

'ताई मग रेनकोट घालुन ड्राईंग करत जा'

रेनकोट? कशाला गं बाबु ?

*अग आई मग शाळेचा ड्रेस खराब नको ना व्हायला!*

ओपी तु मला छान आयडिया दिली मी रेनकोट नाही घालणार शाळेत पण मी रेनकोट मांडीवर पांघरूनच ड्रॉईंग करत जाईन

‘आई मी पण आता मांडीवर रेनकोट घेईन मला दे नां वॉटर कलर’



‘बरं बेटा देते हं मी तुला वॉटर कलर’

......आज ओवी वॉटर कलरने ड्रॉईंग करणार आहे तिने तिचा छानसा रेनकोट मांडीवर पांघरला आणि ती ड्रॉईंग करू लागली. खूप वेळ झाला रेनकोट मांडीवर घेतल्या मुळे तिला निट ड्रॉईंग करता येतच नव्हते. न राहून ओवीने मांडीवरचा रेनकोट काढून फेकून दिला आता छानशी फत्कल मारून तिने ड्रॉईंग ला सुरवात केली.

ओवीचे आता हात भरले

ओवीचे कपडे भरले
थोड्यावेळाने मॅट पण खराब झाली.
ड्रॉईंगसाठी लागणारे पाणी सगळीकडे सांडले.
कागद ओला झाला
घरात खूप पसारा झाला.

आज सर्व पसारा ओवीनेच आवरला,
ओवीने पाण्याचा मग उचलला आणी धुवून बाथरूम मध्ये ठेवला,
मग तिने सगळे कागद उचलून ठेवले खाली सांडलेला रंग पुसुन काढला

मग आईने तिला छान पैकी आंघोळ घातली
भरपुर फेसाच्या टब मध्ये बसल्यावर आई ला तिचा निर्णय ऐकवला

‘आई आता मी आद्दु ताई एवढी मोठी झाल्यावरच वॉटर कलर वापरेन’

आंघोळ झाल्यावर ओवीने स्केचपेन घेतले स्केचपेन घेतल्यावर ओवीने खुप चित्र काढले ओवीने वाट्टेल तसे चित्र काढले
ओवीने बसुन चित्र काढले
ओवीने झोपुन चित्र काढले
ओवीने हातावर चित्र काढले
ओवीने पायावर चित्र काढले
ओवी स्केचपेनला कंटाळली

आता ओवी बाथरूम मध्ये जाऊन स्टूलवर बसुन हाता पायाला साबण चोपडत बसली खूप साबण लावला मग मऊमऊ घासणीने सुद्धा घासले अंगाचा रंग खूप वेळाने गेला.

‘आई आपण उगाचच स्केचपेन नी रंगवले’
‘हे बघ बाबू आम्ही खराबच नाही झालो’
‘आई मी पण मोठी झाल्यावर छान छान चित्र काढेन आणि माझे अंग पण नाही भरणार हो ना?’



थोडावेळाने ओवीने ताई ने दिलेला तेलकटखडूचा डबा काढला

आता ओवीने खूप चित्र काढले

ओवीने सुर्य काढला

ओवीने फुल काढले
ओवीने मासा काढला
ओवीने फुलपाखरू काढले

ओवीने वाट्टेल तसे चित्र काढले
ओवीने बसुन चित्र काढले
ओवीने झोपुन चित्र काढले

ओवीचे हात पाय खराब झालेच नाही
आता तिला आंघेळ करावी लागली नाही
आता तिला हात पाय धुवावे लागले नाही
ओवीला तेलकट खडू खूप आवडले
सगळयाना ओवीचे चित्र आवडले
आईला ओवीचे चित्रकलेचे वेड आवडले.

# ओवीने इंद्रधनुष्याला हातात धरले!

नुकताच पाऊस पडुन गेलेला होता. आभाळ गुलाबी दिसत होते, हया वातावरणात ओवी वेडी झाली होती

वाव ! आई काय छान दिसतय बाहेर, चल ना आपण फिरायला जाऊ.

आईच्या मागे मागे फिरत ओवी बाहेर जाण्याचा नुसता हट्ट करत होती.

ओवी, चल आई आदुताईचा अभ्यास घेतेय ना आपण जाऊ चल फिरायला.

बाबाच्या तोंडातुन शब्द निघताच ओवी बाबांबरोबर फिरायला जायला एका पायावर तयार झाली. ओवीने छान छान कपडे घातले आणि बाबांचा हात धरून ती दोघे फिरायला निघाली.



बाबा मोठया गाडीतुन नाही जायचं आपण छोटी गाडी घेऊनच जाऊ

बाबांनी आपली मोटर सायकल काढली ओवीला पुढे बसवले आणी ती दोघे निघाली.

'ओवी बघ ते झाड त्याला किती फुले आले आहेत. हे झाड फुलांनी बहरलय. काय म्हणतात याला बहरलय , बेटा सांग बर ..'

बल्लय.

'नाही बहरल काय म्हणायचय' बहरलय .

बाबा बहरल म्हणजे काय हो ?

‘झाड फुलांनी गच्च भरून गेलं म्हणजे इतक भरून जात कि झाडाच पानच दिसत नाही त्याला बहरलं म्हणतात.’

वाव! बाबा किती छान दिसतंय ना झाड.



पुढे रस्त्याने जाता जाता ओवीला फुलांची जितकी झाड दिसली तितकी बहरलेली झाड ती खुप आनंदाने बाबांना दाखवत होती.

बाबा पण ओवी बरोबर गाडीवर मजा करत करत गेले.

बाबांनी ओवीला रस्त्याने छान वाहणार पाणी , डोंगरावरून वाहणारे छोटे छोटे धबधबे , हिरवे हिरवे डोंगर दाखवले खुप खुप मजा करत दोघे एका टेकडीवर गेले. टेकडीच्या गवतावर बाबा मस्त पैकी लोळत पडले.बाबांच बघुन ओवी सुद्धा त्यांच्या शेजारी टेकडीवर लोळत पडली.

तितक्यात बाबांना आकाशात एक सुंदर इंद्रधनुष्य दिसले.

'ओवी ते बघ किती सुंदर इंद्रधनुष्य आहे'

कुठे ओ बाबा

'अगं आकाशात बघ वरती दिसले का ?'

मला नाही दिसतय

'अरे बेटा वरती बघ जो रंगीत पट्टा आहे ना त्याला इंद्रधनुष्य म्हणतात.

पाऊस पडुन गेला कि आकाशात खुप सुंदर इंद्रधनुष्य दिसते.

या इंद्रधनुष्यात सात रंग असतात.

ते म्हणजे लाल नारंगी पिवळा हिरवा निळा पारवा जांभळा .

तुला कोणता रंग आवडतो ?’



मला ना यल्लो कलर आवडतो

‘इंद्रधनुष्यात कुठे दिसतो यल्लो कलर ? दाखव बर’

नाही बाबा मला खुप मोठा निळा कलर दिसतो.

बाबा मला इंद्रधनुष्याला हात लावायचा आहे आपण इंद्रधनुष्यात रहायला जायच का

‘कस जायच बर इतक्या उंच ?’

विमानाने

आपण इंद्रधनुष्यात गेलो कि आपल्या अंगाला खुप रंग लागेन ना रंगपंचमी सारखे रंगपंचमीला तुम्ही इंद्रधनुष्ययावर गेले होते का ? बाबा आपण बाटली भरून रंग आणु नाही तर आपण एक नळीच घेऊन जाऊ आणी रंगाचा मोठा शॉवर करू

आपण आईला सुद्धा घेऊन जाऊ

'अरे बेटा आपण इंद्रधनुष्यावर जाऊ शकत नाही म्हणुन देवबाप्पाने हे सगळे रंग जमिनीवर सांडवुन टाकले आहे. तुला बघायचे आहे का

हे बघ लाल नारंगी पिवळया रंगांचे फुले आणी हे हिरव्या रंगाचे गवत निळया रंगाचे ब्ल्यु बेरी आणी जांभळया रंगाचे जांभुळ आहे की नाही इंद्रधनुष्य जमिनीवर.

आता तु इंद्रधनुष्यला हात लावु पण शकतेस.'

बाबांच वाक्य पुर्ण व्हायच्या आतच ओवी गवतावर आलेले खुप फुले हातात घेऊन आली.

बाबा हे बघा किती वेगवेगळे रंग आहेत याचे हया फुलांना रंग इंद्रधनुष्यातुनच मिळाले का म्हणजे देवबाप्पाचे इंद्रधनुष्य हे मोठी रंगपेटीच आहे का ? बाबा मी इंद्रधनुष्य हातात धरले.

...... घरी येउन ओवीने आईला आणी आदुताईला इंद्रधनुष्याची गोष्ट सांगितली.

ओवीने आणलेल्या फुलांची एक माळ बनवली आणी आदुताईला दिली.

आदुताई ही घे तुला वॉटर कलरची मोठी रंगपेटी. आता तुझे कलर कधीच नाही संपणार.

अरे वा ! मला खुप आवडली हं तु दिलेली वॉटर कलरची रंगपेटी मी खुप जपेन हं राणी. मला आता पपी दे बर छान छान रंगपेटी दिल्याबद्दल.

ओवी सुद्धा खुप लाडात येऊन आदुताई जवळ जाऊन बसली आणी आदुताईला खुपखुप पपी देत बसली.



## आई कांगारू पिल्लु कांगारू

छानसं प्राण्यांच्या चित्रांच पुस्तक ओवी बघत होती. पुस्तकांचे पान उलटे पालटे करत होती. तिकडून आई आली ओवीच्या जवळ येउन बसली

काय करतेस गं बाबू? अरे वा! अभ्यास चालू आहे वाटतंय

आईच्या कुशीत घुसून 'आई मला सांगना गोष्ट' असा हट्ट करू लागली.

मग आईने पण ओवीला जवळ घेतले अन पुस्तक उघडले. प्रत्येक प्राण्यांवर बोट ठेवले आणि त्यांचे नावे सांगितले.सर्वात मध्यभागी होता एक वेगळाच प्राणी नाव त्याच कांगारू !

कागांरू ओवीला खुप आवडला आईने सांगितल त्याच्या पोटात एक पिशवी असते त्या

पिशवीत तो त्याच्या ओवीला ठेवतो.ही आई कागांरू अन हे पिल्लू कागांरू.



आई मग आदुताई कागांरू कूठेय.

ती ना बाबां बरोबर खेळतेय हया चित्रात फक्त आई आणि ओवीच आहे.

आई ही तु आणि ही मी.

आई कागांरू पिल्लु कागांरू

कागांरू

ओवीच्या मनात खुप बसला.

आई तु पण तुझ्या पोटाला एक पिशवी शिवतेस का? मी पण त्यात बसत जाईन .

मग आईने माळयावरच्या बॅग मधुन काहिस काढल ओवीला ते समजतच नव्हत मग आईने ती बॅग गळयातुन अडकवली.

‘बर का बाबु तु छोटा छोटा बाळ होता तेव्हा मी तुला हयाच बॅग मध्ये ठेवत होती आणि गाडीवरून आजीकडे सोडत होती.ही कागांरू बॅग आहे. चल आता बसायच का तुला हया बॅग मध्ये?’

ओवी आनंदाने बसायला आली पण ……

पण सगळीकडून बांधुन ठेवलेल ओवीला नाही आवडल.

आई मला खाली उतरव मला नाही बसायच.

छोटुकल्या बॅगेत ओवी मावलीच नाही. पिशवीच फॅड तर लगेचच गेल पण कांगारू कायमचाच लक्षात राहिला.

डिस्कव्हरी चॅनलवर परत जेव्हा कागांरू बघायला मिळाला तेव्हा ओवीने ओरडूनच आईला सांगितल ‘आई आपण दोघी काय खेळतोय?

आईसारखच पिल्लु म्हणुन आई सारखीच ओवी असलीच पाहिजे.

ओवीने आईसारखेच बुट घेतले सगळयांनी तिला खुप सांगितल अग छान पिंक बुट घे छान यल्लो घे पण छे! ओवीला तर आई सारखेच व्हायचे होते म्हणुन छान छान बुट नाकारून तिने आईसारखे साधेसुधे कॅनवॉसचे बुट घेतले आणि दुकानातच आईला चिटकुन सांगितले ‘आई कागांरू पिल्लु कागांरू’

आई सारख्याच बांगडया, आई सारख्याच टिकल्या, आई जे जे घेईल ते ते ओवीला अगदी तसच सेम टु सेम पाहिजे.

आई सारखाच ओढणीचा ड्रेस घ्यायचा म्हणुन सारखा हट्ट करायची. ओढणीचा ड्रेस,

ओढणीचा ड्रेस दिवस भर आपला ओढणीचा ड्रेस. मग मामाने सुद्धा वाढदिवसाला चांगले दोन ओढणीचे ड्रेस आणले. सर्वांनी आणलेल्या ड्रेस ला साधा हात ही न लावता स्वारी फक्त ओढणीचे ड्रेस घालुनच इकडुन तिकडे वागडत होती.आता झालीच ना मी आई सारखी ‘आई कांगारू पिल्लू कांगारू’

घरात सुद्धा सगळयांना ओवीचे वाक्य पाठ होते. ‘आई कांगारू पिल्लू कांगारू’

आई सारखीच एखादी गोष्ट झाली कि ओवी लगेच सगळयांना सांगत ‘आई कांगारू पिल्लू कांगारू’

हया सगळयात एकदा एक गंमत झाली. डॉक्टर काकांनी आई ची साखर बंद केली मग आई रोज बिन साखरेचा चहा पिऊ लागली. आता ओवी कांगारू ह्यात मागे कशी रहाणार. तिने पण आईकडे बिन साखरेचा चहा मागितला

तुला नाही आवडणार पिल्लू बिन साखरेचा चहा तु आपला साखरेचाच चहा घे. पण आई पेक्षा वेगळ कस काय व्हायच तिने हट्टाने बिन साखरेचाच चहा घेतला त्या दिवशी तर भिस्किट बुडवण्यात सगळा चहा संपला म्हणुन विषेश काही वाटल नाही.पण दुसऱ्यादिवशी सुद्धा ओवीला बिन साखरेचा चहा हवा होता हट्टाने आई कडून बिन साखरेचा चहा घेतला आणि आई ला म्हणाली 'आई कांगारू पिल्लू कांगारू'

आज तर चहा प्यायचा होता चहाचा एक घोट घेतला अन आई हे कसतरी लागतय.

अरे बाबू आई कांगारू पिल्लू कांगारू ना? मग मी कसा बिन साखरेचा चहा घेतला तु पण घे ना! चमचा भर साखर चहात टाकता टाकता आई ने सांगितल

ओवीने पुन्हा एक घोट घेतला आता चहा छान लागला .

‘आई कांगारू पिल्लू कांगारू’ ही गंमत घरात तर चालत राहीली.ओवीला पण आई पेक्षा वेगळ बनायच नव्हतच.



# वाचकांना विनंती

आपण आपल्या घरात मुलांना वाढवताना येणारे अनुभव आम्हाला लिहून पाठवा ना.

असंच छान पुस्तक बनवुया.

पाठवाल ना?

अनघा-अदिती-ओवी (आणि कॅमेऱ्यामागे अतुल)







## ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत. महाराष्ट्राच्या जवळपास प्रत्येक तालुक्यातील खेड्यापाड्यांत ई साहित्य चे वाचक आहेत. याशिवाय सुमारे तीस ते चाळीस लाख वाचक ई साहित्यच्या वेब्साईटला भेट देऊन पुस्तके डाऊन लोड करतात. पण याने आमचे समाधान नाही. जोवर महाराष्ट्रातील प्रत्येक साक्षर हा वाचक होत नाही तोवर ही चळवळ चालेल. आमचे लक्ष्य सहा कोटींचे आहे. आमच्या पाठीशी माऊलींचा आशिर्वाद आहे. “ ईये मराठीचिये नगरी, ब्रह्मविद्येचा सुकाळू करी” ही त्यांची प्रार्थना आपणा सर्वांकरवी सुफ़ळ संपूर्ण व्हावी.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं!

ई साहित्य • ई पुस्तके • ई साहित्य • ई पुस्तके • ई साहित्य • ई पुस्तके • ई साहित्य •

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com